दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०३७/२०१७-१८
दि.१७/०३/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.मनोज जे. कपाडिया, ................अपिलार्थी
५०४, वृन्दावन अपार्टमेंट,
सालासर ब्रिज भुमि कॉम्प्लेक्स,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.मनोज जे. कपाडिया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.२४/०१/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

अ) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर पदनिर्देशित व प्रभाग अधिकारी प्रभाग क्रमांक-१ सद्या या पदावर कार्यरत असलेले श्री.सुदाम गोडसे साहेब यांच्या धर्मपत्नी श्रीमती फाल्गुना सुदाम गोडसे यांनी खालीलप्रमाणे जमीन कायम खरेदीखताने विकत घेतलेली होती.

| दस्त | दस्त दिनांक | दस्त क्र. | गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|---|
| कायम खरेदी खत | २२/०८/२००६ | टनन-४ ०७२०३ | उत्तन | १४१ | १-अ | ८०० |
| कायम खरेदी खत | २२/०५/२००७ | टनन-७ ०४३१५ | उत्तन | १४१ | ३ | २४०० |

उपरोक्त गाव मौजे उत्तन येथील जमिन सर्व्हे नं.१४१ हिस्सा नं.३, क्षेत्रफळ २४०० चौ.मी. पैकी १८०० चौ.मी. श्रीमती फालगुन सुदाम गोडसे यांनी दिनांक ०९/१२/२०१० रोजी नोंदणीकृत कायम खरेदी खताने दस्त क्रमांक १००७५ या द्वारे श्री.सुदामराव चंद्रु गायकवाड (मिरा भाईंदर महानगरपालिकेचे माजी आयुक्त) यांना विक्री केली आहे.

ब) २००६ ते हा अर्ज निकाली लागेपर्यंत.

क) उपरोक्त संबंधित माहितीचा विषयान्वये मला कृपा करुन खालीलप्रमाणे कागदोपत्री माहिती द्यावी.

१. श्री.सुदाम गोडसे साहेब यांनी त्याच्या पत्नीच्या नावावर उपरोक्त जमिन खरेदी व विक्री करण्यापुर्वी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम, १९७९ कलम १९(२) अंतर्गत विहित प्राधिकरणाला/ सक्षम अधिकारीला अगोदर कळविण्याकरिता दाखल केलेला विनंती अर्जाची प्रत द्यावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.२७/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१७/०३/२०१८ रोजी दुपारी १२.५० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/२४०/२०१८ दि.०५/०३/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- राज्य माहिती आयोग, खंडपीठ, पुणे, त्यांचेकडील परिपत्रक क्र.संकीर्ण/२००९/प्र.क्र.५१/०९/आस्था दि.०५/०८/२००९ यांनी केलेल्या सुचनेची प्रत जोडलेली आहे. अपिलासोबत आढळुन येत नाही. यात तुम्ही संबंधित अधिकारी श्री.सुदाम गोडसे साहेब यांचेकडून लेखी स्वरुपात निश्चित कालमर्यादेत माहिती मागवावी जेणेकरुन हे स्पष्ट होणार की, मी मागितलेली माहिती श्री.सुदाम गोडसे यांनी महानगरपालिकेचे सक्षम अधिकारी यांचेकडे दाखल केली होती किंवा नव्हती किंवा दाखल केली असेल आणि आढळुन येत नाही तर संबंधितावर गुन्हा दाखल करावा व स्पष्टपणे उत्तर द्यावे याकरिता प्रथम अपिल दाखल केले आहे.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली असुन पुनश्च: अभिलेखाचा शोध घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: निर्णय :-

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी पुनश्च: अभिलेखाचा शोध घेण्यात यावा. माहिती उपलब्ध नसल्यास श्री.सुदाम गोडसे यांना कळवून त्यांचेकडून माहिती प्राप्त होताच सदर बाबत अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. सबब, सदर अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई

४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.मनोज जे. कपाडिया,
५०४, वृन्दावन अपार्टमेंट,
सालासर ब्रिज भुमि कॉम्प्लेक्स,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.